माध्यमिक स्तरावरील व्दितीय भाषा हिंदी विषयाच्या अभ्यासक्रमातील मूल्य या आशय घटकावर आधारित अनुदेशन संचाचे विकसन व परिणामकारकता

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या पीएचडी शिक्षणशास्त्र पदवीच्या परिपूर्तीसाठी सादर केलेला शोध प्रबंधाचा गोषवारा

संशोधक

सौ.शोभा संग्राम पाटील

एम.ए.एम.एड,सेट

मार्गदर्शक

डॉ.बालाजी जी गिरगावकर

एम.एस्स.एम.एड पी.एच.डी (शिक्षणशास्त्र)

प्राचार्य

शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मे, २०१९

प्रस्तावना

आज आपल्या देशात भ्रष्टाचार, अनाचार, स्वार्थांधता, काळा बाजार आणि हिंसाचार यांचा सर्वांगिक संचार प्रत्येक सुजाण नागरिकाला अस्वस्थ करताना दिसतो. आज पर्यावरण संतूलन समस्या, प्रदुषण, वाढती बेकारी, वाढती लोकसंख्या, विविध सामाजिक प्रश्न अशा अनेक समस्या आहेत. आज एकत्र कुटूंबपध्दतीचा ऱ्हास होत आहे. आई–वडिल नोकरीस किंवा इतर व्यवसायाच्या निमित्ताने घराबाहेर असतात मुलांच्या या संस्कारक्षम वयात त्यांच्यावर संस्कार करण्याची जबाबदारी शाळेवस्ती म्हणजे शिक्षकांवरती आली आहे. शिक्षकांनी आपापल्या विषयाच्या अध्यापनाद्वारे पाठयपुस्तकातील आशयातून मूल्यशिक्षण विद्यार्थ्यांना देवून संस्कारक्षम वर्तन घडावे यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. मूल्यशिक्षण हे मानवी जीवनाला संस्काराचा आकार देत असते अध्यापनातून जाणीवपूर्वक संस्कार करण्याचे काम शिक्षक करीतच असतात. परंतु अपेक्षित व्यक्तिमत्व विकासाबरोबर चारित्र्याची जडणघडण करण्याचे काम सद्यपरिस्थितीत करणे आवश्यक वाटते. पाठ घटकातून प्रतिबिंबीत झालेली मूल्ये विदयार्थ्यांमध्ये संक्रमित करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न शिक्षकांनी करणे आवश्यक वाटते.

मूल्यशिक्षण हे प्राचीन काळापासून दिले जात आहे. १९८६च्या शैक्षणिक धोरणात मूल्याशिक्षण स्वतंत्रपणे अंमलात आणले. जून १९९७ पासून मूल्यशिक्षण महाराष्ट्र शासनाने अनिवार्य केले या मूल्यशिक्षणासंबंधी एकूण दहा मूल्यांवर अधिक लक्ष दिलेले आहे. माध्यमिक स्तरावरील हिंदी पाठयपुस्तकात विविध मूल्यांचा अंतर्भाव केलेला आहे. संशोधकाच्या अध्यापनाचा विषय हिंदी असल्याने हिंदी विषयाच्या पाठयपुस्तकांतून इयत्ता ९वी आणि १०वी च्या अभ्यासक्रमातील निवडक मूल्ये शिक्षक अध्यापनातून रूजवतात की नाहीत व ती कशी रूजवितात हे अभ्यासावे वाटले. कुमारावस्थेमध्ये विदयार्थ्यांच्या जीवनाला एक दिशा मिळत असते. त्यांच्यात जर मूल्ये खऱ्या अर्थाने रूजली तरच सक्षम समाज आणि सक्षम राष्ट्रघडणीचे कार्य होवू शकते. समाजाची आपल्यावर काहीतरी जबाबदारी आहे ही भावना याच वयात मूल्यशिक्षणाच्या माध्यमातून निर्माण होवू शकते. यासाठी माध्यमिक स्तरावरील विदयार्थ्यांमध्ये मूल्ये खऱ्या अर्थाने रूजविण्यासाठी हिंदी विषयाच्या अभ्यासक्रमातील मूल्य या आशय घटकावर आधारित अनुदेशन संचाचे विकसन करून मूल्य या घटकावर प्रकाश टाकण्याचे काम प्रस्तूत संशोधन करेल.

संबंधित साहित्याचा व पूर्व संशोधनाचा आढावा

संशोधकाने निवडलेल्या समस्येबाबत/यापूर्वी कोणत्या संशोधकाने या विषयाच्या संदर्भात विचार मांडले आहेत याचा शोध घेऊन ते संबंधित साहित्य सदरील समस्येचा अभ्यास करण्यासाठी मदत म्हणून वापरले आहे.

संशोधन समस्येचा जो गर्भित विषय आहे. त्या विषयावर इतर साहित्य असते त्याचे अवलोकन करणे म्हणजेच संबंधित साहित्याचा आढावा घेणे होय. कारण या साहित्याच्या पायावरच संशोधन प्रक्रियेची पुढील इमारत उभी राहत असते. संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा अचुकपणे ठरविण्यास मदत होते. विविध संशोधनात वापरलेल्या कसोटया व पद्धतीचा तपास घेतल्याने संशोधकाने आपल्या संशोधनाची पध्दती कोणती ठेवावी याचे मार्गदर्शन मिळत असते.

संबंधित साहित्य म्हणजे नवीन साहित्यकामी यापूर्वी संशोधन केलेल्या संशोधकाच्या साहित्याला जे की नव्या संशोधकाला उपयोगी पडणारे साहित्य होय.

संबंधित साहित्य खालीलप्रमाणे :—

दाबेराव भावना (२००८), दुर्योधन अविनाश (२००९), भेंडे वंदना (२००९), ठाकरे स्मिता (२००९), पोळपेल्लिवार शिल्पा (२००९), खोब्रागडे (१९९८), पुराणिक प्र.अ (१९९४), माने एस (२००७), सरवणकर व्ही (२००३), जामकर पी (२००७), कुलकर्णी ए (२०००), गागरे (२०१४), दुर्योधन ए (२००९), डांगे अरूणा (२००२), फेगडे निलकंठ (२००२), वडवान एम (२०१०), भालेराव वैशाली (२०१४) यांनी केलेल्या संबंधित संशोधनाचे व साहित्याचे सिंहावलोकन केले असे लक्षात आले की मूल्य या आशय घटकावर आधारित अनुदेशन संचासंदर्भात संशोधन झालेले नाही यासाठी सदर विषयावर संशोधन होणे गरचेचे वाटते.

समस्या विधान –

माध्यमिक स्तरावरील व्दितीय भाषा हिंदी विषयाच्या अभ्यासक्रमातील मूल्य या आशय घटकावर आधारित अनुदेशन संचाचे विकसन व परिणामकारकता

समस्या विधानातील पारिभाषिक संज्ञांच्या व्याख्या

संशोधन विषय अधिक स्पष्ट व्हावा या हेतूने संशोधन समस्या विधानातील पारिभाषिक शब्दाच्या व्याख्या पुढिलप्रमाणे दिल्या आहेत.

माध्यमिक स्तर –

संकल्पनात्मक व्याख्या

महाराष्ट्रातील माध्यमिक शिक्षणातील १०+२+३ या आकृतीबंधामधील १० मधील इयत्ता ९ ते १० यांचा समावेश असणारा शालेय स्तर म्हणजे माध्यमिक स्तर होय.

कार्यात्मक व्याख्या

प्रस्तुत संशोधनामध्ये इयत्ता ९वी या स्तरावर असणाऱ्या हिंदी पाठयपुस्तकातील आशय घटकावर अनुदेशन संचासंदर्भात माध्यमिक स्तराचा विचार केलेला आहे.

हिंदी –

संकल्पनात्मक व्याख्या

हिंदी विश्वाची एक प्रमुख भाषा आहे. हिंदी ही भारताची राजभाषा आहे. भारतामध्ये सर्वात जास्त बोलली जाणारी आणि समजून घ्यायला सोपी भाषा आहे.

कार्यात्मक व्याख्या

माध्यमिक स्तरावर अध्ययन अध्यापनासाठी असलेल्या त्रिभाषांपैकी व्दितीय भाषा म्हणजे हिंदी भाषा होय.

विकसन

संकल्पनात्मक व्याख्या

Development is the act or process of developing intolding a graduak growth or advancement through progressive changes.

-New Webster Dictionary (2007)

कार्यात्मक व्याख्या –

इयत्ता ९वी च्या विदयार्थ्यांसाठी व्दितीय भाषा हिंदी विषयातील निवडक मूल्ये यावर आधारित अनुदेशन संचाची निर्मिती व त्याची परिणामकारकता तपासणे म्हणजे विकसन होय.

अभ्यास –

संकल्पनात्मक व्याख्या

Study means an investigation of the particular subject or the published findings of such an investigation

कार्यात्मक व्याख्या

माध्यमिक स्तरावरील इयत्ता ९वी च्या विदयार्थ्यांसाठी हिंदी विषयातील मूल्य या आशय घटकावर आधारित अनुदेशन संचाची परिणामकारकता पडताळण्यासाठी जमा केलेल्या माहितीचे विश्लेषण वर्गीकरण, अर्थनिर्वचन व निष्कर्ष काढणे म्हणजे अभ्यास होय.

मुल्य–

संकल्पनात्मक व्याख्या

बौध्दीक नैतिक आणि सौंदर्यविषयक द्रुष्टिकोनातुन आपल्याला ज्याबददलची पसंती जानवते ते मुल्य

कार्यात्मक व्याख्या –

शिक्षणाच्यामाध्यमातुन बालक उत्तम नागरीक बनावा यासाठी त्याच्यात अनेक गुणांची रुजवन करतो त्यामध्ये श्रमप्रतिष्ठा स्वावलंबन पर्यावरण रक्षण, राष्ट्रप्रेम,वैज्ञानिक द्रुष्टिकोन, निर्मिती क्षमता,समानता,बंधुता यासारख्या गुणांना मुल्य म्हणतात.

अनुदेशन संच

संकल्पनात्मक व्याख्या

एखादा विशिष्ट वर्तनबदल किंवा उदिदष्ट साध्य करण्यासाठी ठरावीक पाठयांश,अध्यापन पदधती,साहित्य,मानवी व इतर सुविधा,साधने यांचे एकत्रीकरण करुन केलेल्या अध्यापनाच्या कार्यवाहीचे नियोजन होय.

संशोधनाची उद्दिष्टे –

१)माध्यमिक स्तरावरील व्दितीय भाषा हिंदी विषयाच्या अभ्याकक्रमातील उद्दिष्टानुसार पाठयपुस्तकाचे विश्लेषण करणे.

२) इयत्ता ९वी च्या हिंदी विषयाच्या आशय घटकातून व्यक्त होणाऱ्या मूल्यांचा शोध घेणे.

३) हिंदी आशय घटकांतर्गत मूल्ये विदयार्थ्यांमध्ये रूजविण्यासाठी शिक्षकाच्या कार्यपद्धतीची माहिती घेणे.

४) इयत्ता ९वी च्या हिंदी आशय घटकांतर्गत मूल्ये संक्रमित करण्यासाठी अनुदेशन संचाचे विकसन करणे.

५) इयत्ता ९वी च्या हिंदी आशय घटकांतर्गत मूल्ये संक्रमित करण्यासाठी तयार केलेल्या अनुदेशन संचाची परिणामकारकता तपासणे.

संशोधन गृहितके –

१) माध्यमिक स्तरावरील व्दितीय भाषा हिंदी पाठयपुस्तकातील आशयामध्ये विविध मूल्यांचा समावेश केलेला आहे.

२) मूल्य या आशय घटकावर आधारित अनुदेशन संच विकसित केल्यास मूल्यशिक्षण प्रभावीपणे देता येते.

संशोधन परिकल्पना –

जर माध्यमिक स्तरावरील हिंदी विषयाच्या पाठयपुस्तकातील मूल्य या आशय घटकावर आधारित अनुदेशन संचाच्या साहयाने मूल्यशिक्षण दिले तर विदयार्थ्यांच्या वर्तनामध्ये मोठा बदल होऊ शकतो.

संशोधनाची व्याप्ती –

१) संबंधित संशोधनासाठी माध्यमिक स्तरावरील इयत्ता ९वी च्या वर्गाचा समावेश करण्यात येईल.

२) संशोधनात तालुक्यातील मराठी माध्यमाच्या १०० गुणांच्या हिंदी विषय असणाऱ्या शाळांचा विचार केला जाईल.

संशोधनाची मर्यादा –

१) प्रस्तुत संशोधन माध्यमिक स्तरावरील इयत्ता ९वी च्या हिंदी विषया पुरतेच मर्यादित राहील.

२) प्रस्तुत संशोधन सातारा तालुक्यातील मराठी माध्यमाच्या शाळांपुरतेच मर्यादित राहील.

संशोधनाच्या परिमर्यादा –

१) प्रस्तुत संशोधन हे सातारा तालुक्यातील इयत्ता ९वी मधील मराठी माध्यमाच्या ज्यांना १०० गुणांचा हिंदी विषय आहे अशा विदयार्थ्यांसाठी मर्यादित असेल.

२) प्रस्तुत संशोधना अनुदेशन संच माध्यमिक स्तरावरील मूल्य या आशय घटकावर आधारित असेल.

३) प्रस्तुत संशोधनातील अनुदेशन संचाची परिणामकारकता तपासणीसाठी २०२०–२१ या शैक्षणिक वर्षात शिकणाऱ्या इयत्ता ९वी च्या विदयार्थ्यांचा समावेश केला जाईल.

संशोधनाची गरज व महत्व –

गरज –

इयत्ता ९वी च्या विदयार्थ्यांचे वय हे अतिशय संवदेनशील आहे. या वयात चांगल्या सवयी लागण्यासाठी मूल्यशिक्षण गरजेचे आहे. विदयार्थी हा वैचारिक हवा त्याने संकुंचित वृत्ती ठेवू नये. इतरांच्या आदरास पात्र होईल असा जीवन व्यवहार मूल्यशिक्षणाने अपेक्षित आहे.

मूल्यशिक्षणाने स्वत:स ओळखून समजून घेता येईल. त्यानुसार स्वत:च्या मर्यादा आणि सामर्थ्य लक्षात आले की त्यांना स्वत:मध्ये खूप परिवर्तन करता येईल. जीवनातील प्रत्येक काळ वेळ ही महत्वाची असते त्या काळाचा वेळेचा सदुपयोग करून समाजहिताला प्राधान्य दिल्यास आदर्श समाजाची निर्मिती करण्यास निश्चितच मूल्यशिक्षण उपकारक ठरेल. नियमितपणा, स्वच्छता, आत्मसंयम, श्रमप्रतिष्ठा, उदयोगशीलता, कर्तव्यदक्षता, सेवाभावना, निर्मितीक्षमता, संवेदनशीलता, पर्यावरण संरक्षणाबाबत निष्टेची भावना अशाप्रकारच्या भावनांचा विकास करण्यासाठी सदरचे संशोधन गरजेचे आहे.

महत्व –

विदयार्थ्यांला त्याच्या जबाबदारीची जाणीव करून दयावी लागणार आहे. त्याचबरोबर देशाच्या निकोप विकासाला आणि समाज स्वास्थाला महत्व देणारा भारतीय माणूस निर्माण करण्याचे कार्य मूल्यशिक्षणातून होऊ शकते. विदयार्थी जीवन विकसित करताना जीवनाला योग्य वळण मिळण्यासाठी आणि मिळालेल्या वळणानुसार भविष्यात समर्थ जीवन जगण्यास सक्षम होण्यासाठी मूल्यशिक्षण महत्वाचे आहे. मूल्यशिक्षण हे विदयार्थ्यांच्या आचरणाचे एक प्रभावी साधन आहे. कुमारावस्थेतील वय हे अतिशय संवेदनशील असते. याच वयात जीवनाभिमुख मूल्यांची शिकवण दिल्यास विदयार्थी विकास यथार्थपणे घडून येतो. आज त्रिकोणी कौटूंबिक वातावरणाचा परिणाम मुलांवरती होत आहे. तसेच मानवी जीवनाची होणारी भौतिक प्रगती व या प्रगतीमध्ये माणसाने स्वत: निर्माण केलेल्या गरजा त्या गरजा पुरविण्यासाठी सतत धडपड यामध्ये आवश्यक तेवढा वेळ मुलांना देता येत नाही म्हणून मूल्यशिक्षण महत्वाचे आहे. विदयार्थ्यांवर संस्कार करून त्याचे रूपांतर सुसंस्कारामध्ये करण्यासाठी या वयातील विदयार्थ्यांचे भावविश्व सत्य, शिव आणि सुंदर या तत्वत्रयींनी सजविण्यासाठी मूल्यांचे असलेले अनन्यसाधारण महत्व औपचारिक व अनौपचारिकरित्या मनावर बिंबविणे महत्वाचे आहे.

संशोधन कार्यपद्धती

संशोधन पद्धती –

१) प्रस्तुत संशाधनात वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला जाईल.

यामध्ये अनुदेशन संचाचे विकसन करताना अनुदेशन संच विकसनाचा विचार केला जाईल.

१) नियोजन

२) निर्मिती

३) अंमलबजावणी

४) परिणामकारकता तपासणी

अनुदेशन संचाची परिणामकारकता तपासण्यासाठी प्रायोगिक संशोधन पद्धतीचा वापर केला जाईल.

संशोधन अभिकल्प –

प्रस्तुत संशोधनासाठी अनुदेशन संचाची परिणामकारकता तपासण्यासाठी एकल गट अभिकल्पाचा वापर करण्यात येईल.

नमुना निवड –

संशोधनातील विविध टप्प्यानुसार पुढिलप्रमाणे निवड केली जाईल.

अ) पाठयपुस्तक विश्लेषणासाठी हिंदी विषयातील मूल्य हा आशय घटक आणि अनुदेशन संचाची तपासणीसाठी हिंदी तज्ञाची निवड असंभाव्यता नमूना निवड पद्धतीतील सहेतूक पद्धतीने केली जाईल.

ब) पथदर्शी कार्यवाहीसाठी शाळांची निवड

सातारा जिल्हयातील ११तालुक्यातील शाळा

मराठी माध्यमाच्या शाळा | इंग्रजी माध्यमाच्या शाळा

पूर्ण हिंदी | हिंदी संस्कृत

3१०० गुण´ | 3५० गुण´

यातील मराठी माध्यमाच्या द्वितीय भाषा हिंदी विषय शिकणारे (१०० गुण) इयत्ता ९ वी चे विद्यार्थी असंभाव्यता नमुना निवड पद्धतीतील सप्रोयजन पद्धतीने निवडले जातील.

माहिती संकलनाची साधने

१) हिंदी आशय घटकांतर्गत मुल्ये विद्यार्थ्यांमध्ये रूजविण्यासाठी शिक्षकाच्या कार्यपद्धतीची माहिती घेण्यासाठी प्रश्नावली आणि पाठ निरीक्षण.

२) अनुदेशन संचासंर्दभात तज्ञांची मते घेण्यासाठी मतावली.

३) अनुदेशन संचाची परिणामकारकता तपासण्यासाठी संशोधक निर्मित पुर्व चाचणी व प्राविण्य संपादन इतर चाचणीचा उपयोग केला जाईल.

संख्याशास्त्रीय साधन –

सदर संशोधनामध्ये संख्याशास्त्रीय विश्लेशणासाठी शेकडेवारी, mean, SD,t Test या साधनांचा वापर केला जाईल.

प्रकरण योजना

प्रकरण पहिले	–	प्रस्तावना
प्रकरण दुसरे	–	संबंधित संशोधन साहित्याचा आढावा
प्रकरण तिसरे	–	संशोधनाची कार्यपद्धती
प्रकरण चौथे	–	संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन
प्रकरण पाचवे	–	सारांश, अनुमान व शिफारशी

संशोधनासाठीचे वेळापत्रक

- संबंधित संशोधन साहित्याचा आढावा – ऑगस्ट २०१९ ते कार्यपूर्तीपर्यंत
- पाठयपुस्तकाचे विश्लेषण – ऑक्टोबर २०१९ ते डिसेंबर २०१९
- शिक्षकाच्या कार्यापद्धतीची माहिती – जानेवारी २०२० ते मार्च २०२०
- अनुदेशन संचाचे विकसन – एप्रिल २०२० ते ऑगस्ट २०२०
- अनुदेशन संचाची परिणामकारकता तपासणे – ऑगस्ट २०२० ते ऑक्टोबर २०२०
- संकलित माहितीचे विश्लेषण – नोव्हेंबर २०२० ते जानेवारी २०२१
- अहवाल लेखन, टंकलेखन, बांधणी – जानेवारी २०२१ ते मार्च २०२१
- संशोधन अहवाल सादरीकरण – जूलै२०२१

मार्गदर्शक
डॉ.बालाजी जी गिरगावकर
प्राचार्य
शिक्षणशास्त्र महाविदयालय, नांदेड

संशोधक
सौ.शोभा संग्राम पाटील
सहाय्यक प्राध्यापिका
आझाद कॉलेज ऑफ एज्यूकेशन, सातारा